# नवराष्ट्र

**लढा कोरोनाशी** कर्तव्यापलीकडे जाऊन जपली माणुसकी

# लोहमार्ग पोलिसांचे प्लाझ्मा केंद्र

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क, **मुंबई.** प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कायम सतर्क असलेल्या मुंबई लोहमार्ग पोलीस दलाने प्लाझ्मा केंद्र सुरू केले आहे. कोरोना बाधितांच्या उपचारासाठी प्लाझ्मा थेरपी संजीवनी ठरत असल्याने मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त कैसर खालिद यांनी कर्तव्यापलीकडे जाऊन लोहमार्ग पोलीस दलातर्फे प्लाझ्मा केंद्र सुरू केले आहे.

कोरोना संकटात पहिल्या दिवसापासून राज्य पोलीस दलासह लोहमार्ग पोलीस दलदेखील कर्तव्य बजावत आहेत. या संकट काळात ७४९ हून अधिक लोहमार्ग पोलिसांना कोरोनाची लागण झाली. बाधित झालेले लोहमार्ग पोलीस कोरोनावर मात करून सध्या कर्तव्य बजावत आहेत. दरम्यानच्या काळात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने राज्यात धुमाकूळ घातला आहे. या संकटामुळे वैद्यकीय यंत्रणावर ताण पडू लागला. रुग्णांना बेड व ऑक्सिजनची कमतरता भासू लागली. त्यात संसर्गाचा फैलाव जोमाने होऊ लागल्याने रुग्णसंख्येत कमालीची वाढ झाली.



या संकटात कर्तव्यापलीकडे जाऊन माणुसकी जपण्यासाठी लोहमार्ग पोलीस आयुक्त कैसर खालिद यांनी लोहमार्ग पोलीस दलाची प्लाझ्मा बँक सुरू केली. कोरोनावर मात केलेले ७४९ हून अधिक लोहमार्ग पोलीस अंमलदार व अधिकारी प्लाझ्मा देण्यासाठी सज्ज आहेत.



"कोरोनाचे संकट दिवसेंदिवस वाढत आहे. या संकटात प्लाझ्मा थेरपी उपयुक्त ठरत आहे. हे लक्षात घेऊन लोहमार्ग पोलीस दलातर्फे प्लाझ्मा बँक सुरु करण्यात आली आहे. सदर बँक सर्वांच्या सेवेसाठी आहे. प्लाझ्माची गरज भासल्यास त्वरित टोलफ्री क्रमांकांवर संपर्क साधावा. काही क्षणात प्लाझ्मा उपलब्ध करून दिला जाईल. लोकहितासाठी कोरोनावर मात केलेल्यांनी आवश्य प्लाझ्मा दान करावे.

**-कैसर खालिद,**
पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई.

## प्लाझ्मासाठी कॉलसेंटर

कोरोनाची लागण झालेल्या रुग्णांच्या उपचारासाठी प्लाझ्मा थेरपी संजीवनी ठरत आहे. या उपचार पद्धतीमुळे अनेकांनी कोरोनावर मात केली. यामुळे लोहमार्ग पोलिसांनी व पासबान-ए-अदब या सेवाभावी संस्थेच्या मदतीने प्लाझ्मा केंद्र सुरू करण्यात आले आहे. प्लाझ्माची आवश्यकता भासल्यास त्वरित १८००१२००८०००० किंवा लोहमार्गच्या १५१२ क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच प्लाझ्मा दान करण्यास कोणी इच्छुक असल्यास त्यांनीही या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहन लोहमार्ग पोलीस आयुक्त कैसर खालिद यांनी केले आहे.

## ६ लोहमार्ग पोलीस शहीद

कोरोना संकट काळात कर्तव्य बजावताना ६ लोहमार्ग पोलीस अंमलदारांना वीरमरण आले. कर्तव्यासाठी प्रसंगी जीवाची बाजी लावणाऱ्या लोहमार्ग पोलिसांचे कर्तव्य कायम स्मरणी राहणार आहे.

Mumbai Plus Edition
15 May 2021 Page No. 3
epaper.navarashtra.com